# प्रेस नोट

जिल्हा परिषद बीड अंतर्गत दिनांक 30/06/2020 रोजी अनुकंपा तत्वावरील प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शासन सूचनाप्रमाणे अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया राबवणे आवश्यक असल्या कारणाने दिनांक 30/06/2020 रोजी अखेरच्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांचे मुळ कागदपत्राची पडताळणी करणे आवश्यक आहे. दिनांक 14/09/2020 रोजी सदरील प्रतिक्षा यादीवरील अनुक्रमांक 1 ते 45 उमेदवारांनी सकाळी 11.00 ते 2.00 व अनुक्रमांक 46 ते 90 उमेदवारांनी दुपारी 2.00 ते 6.00 व दिनांक 15/09/2020 रोजी अनुक्रमांक 91 ते 135 उमेदवारांनी सकाळी 11.00 ते 2.00 व दुपारी 2.00 ते 6.00 या वेळेत अनुक्रमांक 136 ते 174 या वेळेत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड येथे उपस्थित राहुन प्रतिक्षा यादीवरील नोंदीबाबत स्वतः उमेदवारांनी खात्री करणे तसेच स्वतःचे शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र (जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्यासह) इत्यादी आवश्यक कागदपत्राचे मुळ प्रतिसह एक स्वयं साक्षांकीत झेरॉक्स प्रतिसह उपस्थित राहण्यासाठी याद्वारे जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी साठी उपस्थित राहताना कोविड-19 रोगप्रसार रोखण्यासाठी करावयाचे प्रतिबंधक उपाययोजना पाळणे आवश्यक आहे. जसे की, सामाजिक अंतर राखणे, वारंवार हात साबण / सॅनिटायझरने स्वच्छ करणे, मास्कचा वापर करणे इत्यादीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

तरी विहीत वेळेत उपस्थित न राहिल्यास आपली जेष्ठता यादीतील पुर्वीच्या नोंदी योग्य असल्याचे समजुन त्यांच्या नोंदी दिनांक 30/06/2020 अखेरच्या जेष्ठता यादीमध्ये कायम ठेवण्यात येतील याची नोंद घ्यावी.

त्याच प्रमाणे सदरील भरती प्रक्रिया पारदर्शक पणे राबवण्यात येणार असुन उमेदवारांनी कुठल्याच आमिषाला बळी पडु नये असे देखील आवाहन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड यांनी केले आहे.

( प्रमोद काळे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद, बीड.